**MHPA130016862024**

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२४१/२०२४ मध्ये निशाणी ०१ खाली आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज अर्जदार क्र. ०१ सदाशिव पिता दगडु डाखोरे, यांनी मयत भुजा पिता गणपती क-हाळे यांचे वारस असल्याबाबत मुंबई वारसा अधिनियम अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, (अर्जदाराचा चुलता) काका नामे भुजा पि. गणपती क-हाळे हे दिनांक ३०/०३/२०२१ रोजी मौजे बोल्डावाडी, ता. कळमनुरी, जि. हिंगोली येथे मयत झाले आहे. मयत भुजा पि. गणपती क-हाळे हे मौजे बोल्डावाडी, ता. कळमनुरी जि. हिंगोली येथील कायम रहिवाशी होते. अर्जदाराच्या कुंटूंबियांना क-हाळे व डाखोरे असे संबोधले जाते त्यामुळे त्यांचे अर्जदारचे मयत चुलताचे नाव आडनांव क-हाळे असे नमुद करण्यात आले आहे. तसेच अर्जदाराचे वडील व कुंटूंबियाचे आडनांव डाखोरे म्हणुन नमुद करण्यात आले आहे. क-हाळे व डाखोरे या दोन्ही आडनावाचे एकच कुंटूंब आहे. मयत हा अविववाहीता होता व मयतास मुलंबाळ कोणीही वारस नसुन अर्जदार हाच पुतण्या एकमेव वारस आहे. मयताचे आई-वडील सुध्दा ब-याच वर्षापुर्वी मयत झाले असुन त्यांच्या मृत्यु बाबतचा पुरावा उपलब्ध नाही. म्हणून भुजा पि. गणपती क-हाळे यांचे मृत्यू नंतर अर्जदार हे वारस आहेत. अर्जदारांना शासकीय कामासाठी मयत भुजा पि. गणपती क-हाळे यांचे अर्जदार हे वारस असल्यासंबंधी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रस्तूत अर्जाद्वारे मागणी केली आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने दै.गांवकरी वृत्तपत्रातून जाहिर प्रगटन देवून हरकत व आक्षेप मागविण्यात आले. परंतु प्रकरणात हजर होवून कोणीही उजर घेतलेला नाही.

४. प्रस्तूत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुददे विचाराधीन येतात. सदर मुदयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| **अ.क्र.** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत काय ? | होय. |
| २) | काय आदेश ? | अर्ज मंजूर |

## का र ण मि मां सा

५. अर्जदारा तर्फे सा.क्र. ०१ सदाशिव पिता दगडु डाखोरे (अर्जदार), सा.क्र. ०२ लक्ष्मण बहिर्जी क-हाळे आणि सा.क्र. ०३. विजय सुब्बाराव क-हाळे त्यांचे साक्ष सरतपासाचे शपथपत्र निशाणी ०९, ११ आणि १२ वर दाखल केले. याशिवाय अर्जदारांनी सदर अर्जाच्या पुष्ठयर्थ दै.गांवकरी वृत्तपत्रात दिलेल्या जाहिर प्रगटनाची मूळ प्रत निशाणी १० व मृत्यू प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत निशाणी १३ वर दाखल केले. तसेच अर्जदारांनी पुरावा बंदची पुरशिस दाखल करून आपला पुरावा बंद केला.

६. अर्जदारा तर्फे सा.क्र.०१ ते ०३ यांनी त्यांचे साक्ष सरतपासाचे शपथपत्रात असे नमूद केले की, भुजा पि. गणपती क-हाळे हे दिनांक ३०/०३/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. भुजा पि. गणपती क-हाळे यांचे मृत्यू नंतर अर्जदार हे वारस आहेत. अर्जदारा तर्फे दाखल करण्यात आलेले मृत्यू प्रमाणपत्राची प्रत निशाणी क्र. १० वरून भुजा पि. गणपती क-हाळे यांचा मृत्यू दिनांक ३०/०३/२०२१ रोजी झाल्याचे स्पष्ट होते. याशिवाय दिनांक २८/०८/२०२४ दैनिक गांवकरी वृत्तमानपत्रात जाहिर प्रगटन देवून देखील प्रकरणात हजर होवून कोणीही हरकत व आक्षेप नोंदविलेला नाही. त्यामुळे अर्जदार हे मयत भुजा पि. गणपती क-हाळे यांचे वारस असल्याचे स्पष्ट होते. सदर प्रकरणा मध्ये कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यामुळे सदर अर्ज मंजूर करणे योग्य व उचित होणार आहे. अर्जाचे स्वरूप पाहता अर्जदारांनी शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची मागणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) मयत भुजा पि. गणपती क-हाळे यांचे अर्जदार हे वारस आहेत. त्यामुळे अर्जदारांच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

३) अर्जदारांनी नियमाप्रमाणे मुद्रांक व कोर्ट फि दयावी.

Digitally signed by UMAMA ALAMODI SHAIKH MUZAMMIL ALAMODI
Date: 2025.02.14 13:05:39 +0530

दिनांक ११/०२/२०२५.

(यु.एस.एम. अलमोदी)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कळमनूरी.